**सोलापूर विद्यापीठ**
सोलापूर पुणे महामार्ग, केगांव,
**सोलापूर** - ४१३ २५५ (महाराष्ट्र)
website: http://su.digitaluniversity.ac

**SOLAPUR UNIVERSITY**
Solapur Pune National Highway, Kegaon,
**Solapur** - 413 255 (Maharashtra)
EPABX: 0217-2744763, 66,67 Ext-124
Email : bcudsu@gmail.com

**Ref. No. : SUS/BCUD/PGBUTR/2014-15/** 7379 **Date:** 28 OCT 2014

# परिपत्रक

**प्रति,**
मा. प्राचार्य,
विद्यापीठ संलंग्नीत संशोधन सुविधा केंद्र
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

सोलापूर विद्यापीठ अंतर्गत पीएच.डी. अभ्यास क्रमास नोंदणी केलेल्या सर्व विद्यार्थ्यांना तसेच संशोधक मार्गदर्शक व संशोधन केंद्र यांना आदेशान्वये कळविणेत येते की, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या एमफील/पीएच.डी. पदवी प्रदान करावयाच्या नियमावलीस अनुसरून पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी सादर करण्यात येणा-या स्पायरल बायडीग थिसेस साठी खालील प्रमाणे कार्यपध्दती निश्चीत करण्यात आली आहे.

१) विद्यार्थ्याने नोंदणी केलेल्या दिनांकापासून दोन वर्ष पुर्ण झालेनंतर कोर्सवर्क पुर्ण झाले असल्यास पाच प्रती मध्ये स्पायरल बायडीग थिसेस संबंधीत संशोधन केंद्रामार्फत सादर करता येईल.

२) स्पायरल बायडीग थिसेस विद्यापीठास संशोधन केंद्रामार्फत सादर केल्यानंतर किमान दोन स्पायरल बायडीग थिसेस साठी विभागीय संशोधन समितीची बैठक बोलावणेत येईल. विद्यापीठाचे शैक्षणिक कॅलेडर मध्ये (Academic Calender) पूर्वनियोजित तारखेस आयोजित केलेल्या नियमित विभागीय संशोधन समितीच्या बैठकीसमोर किमान स्पायरल बायडिंग थेसिसची अट लागु असणार नाही. सदर बैठकीची सुचना निर्गमीत केलेल्या दिनांकापासून पंधरा दिवसामध्ये विभागीय संशोधन समिती सदस्य यांनी स्पायरल बायडीग थिसेस मध्ये आवश्यक असलेल्या दुरूस्तीचा रिपोर्ट लेखी स्वरूपामध्ये पीजीबीयुटीआर विभागामध्ये सादर करावेत.

३) स्पायरल बायडीग थिसेस च्या दुरूस्ती बाबतच्या लेखी सुचना विभागीय संशोधन समिती सदस्यां- कडून प्राप्त झाले नंतर अथवा १५ दिवसाची मुदत संपलेनंतर किमान सात दिवसांची मुदत देऊन संबंधित चेअरमन यांचेशी चर्चा करुन विभागीय संशोधन समितीची बैठक बोलावणेत येईल. सदर बैठकीमध्ये विद्यार्थ्यांने प्रबंधाचे सादरीकरण करावे.

४) विभागीय संशोधन समितीची बैठक झालेनंतर प्राप्त अहवाल संबंधीत विद्यार्थ्यास पाच दिवसामध्ये प्रबंधामध्ये लेखी दुरूस्ती करण्याबाबत कळविले जाईल, तद्नंतर नियम क्र. R.Ph.D.20(a) प्रमाणे अंतीम शोध प्रबंध विहीत नमुन्यातील प्रमाणपत्रासह जास्तीत जास्त दोन महीन्यामध्ये संशोधन केंद्रामार्फत सादर करावेत.

सदरचे परीपत्रक संशोधन मार्गदर्शक व संशोधक विद्यार्थी यांच्या निदर्शनास आणून दयावे.

आदेशान्वये

प्राचार्य बी. एम. भांजे
**संचालक**
महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ